बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि १४ मार्च २०२४

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११६/२०२४ भादवि १८८,२७२,२७३,३२८, अन्न सुरक्षा व मानदे कायदा कलम २६(२)(i),२६(२)(ii),२६(२)(iv),३७(३)(E),३०(२)(A),५९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०३/२०२४ रोजी १५.०० वा ते १६.३० वा चे सुमारास, आरोपीताचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०३/२०२४ रोजी २१.३५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रेणुका रमेश पाटील, व्यवसाय- नोकरी, (अन्न व औषध प्रशासन म. राज्य, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, दुसरा मजला, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | महांतेश सिद्राम गुब्याडकर, वय- ३७ वर्षे, रा. ९० जी/५४, भवानी पेठ, शेळगी रोड, सोलापूर |
| **मिळाला माल** | : | ९,२८,७४६/- रु त्यात रजनीगंधा पानमसाला, राजु इलायची सुपारी, बाब नवरतन पानमसाला, बाबा १२० तंबाखु, शुध्द प्लस पानमसाला, विना लेबल पानमसाला, आरएमडी पानमसाला, एम सुगंधीत तंबाखु असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकुर याने राहते घर तसेच भाडयाने घेतलेले गोडाऊन वैदुवाडी, भवानी पेठ, सोलापूर या दोन्ही ठिकाणी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी विक्री हेतु साठा करुन, महा. शासनाचे वतीने मा.अन्न सुरक्षा आयुक्त व औषध प्रशासन मुंबई यांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा अधिसुचना जारी केलेल्या प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखु इत्यादी तत्सम अन्न पदार्थाचा विक्री हेतु महाराष्ट्र राज्यातुन उत्पादन, वाहतुक साठा विक्री बंदी आदेशाचे भंग केले आहे, तसेच नमुद कलमांचा भंग केला आहे व शिक्षापात्र कलम ५९ नुसार शिक्षेस पात्र आहे. तसेच मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांनी जारी केलेल्या जनहित व जन आरोग्याच्या दृष्टीकोनातुन काढलेल्या आदेशाची अवज्ञा केलेली आहे म्हणून. तपास:- पोसई शेख, गुन्हे शाखा, सोलापूर शहर- **८१०८६०९६०९** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८३/२०२४ भादवि १४३,३९२,३४१,३२३,५०४,५०६, मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०३/२०२४ रोजी १६.१५ वा चे सुमारास, भुसंपादन कार्यालय क्रं. ११ जिल्हा परीषद, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०३/२०२४ रोजी २१.०१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | चन्नवीर पंडीत व्हनमाने, वय- ३८ वर्षे, रा. होटगी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) बसवराज सिध्दाराम कुंभार, २) सरुबाई सिध्दाराम कुंभार, ३) राजेंद्र कुंभार, ४) राजश्री कुंभार, ५) इतर दोन अज्ञात इसम, सर्व रा. हत्तुर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व सिध्दाराम कुंभार असे मोटार सायकलीवरुन जात असताना नमुद ठिकाणी आले असता, गावातील शेताबाबत वाद चालु असलेले वरील आरोपीत मजकुर असे सर्व जण मिळुन त्यांचे ताब्यातील बोलेरो वाहन क्रं. एम एच २५ आर २१५९ मधुन मोटार सायकलीचे समोर येवून, रस्ता आडवुन वाहनातुन खाली उतरुन सर्व मिळुन फिर्यादीस व सिध्दाराम याचे अंगावरती धावून येवून, शिवीगाळ करुन, खाली पाडुन अंगावरील शर्ट फाडुन, लाथाबुक्यांनी मारहाण करुन, |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीच्या गळयात हिसका मारुन जबरदस्तीने गळयातील चार तोळयाची सोन्याची चैन तोडुन घेवून चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोसई- शिंदे- **९६८९५९७११६** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८५/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०३/२०२४ रोजी ०४.३० वा चे सुमारास, संजय नगर कुमठा नाका, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०३/२०२४ रोजी २२.१३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रोहित रामचंद्र गायकवाड, वय- २१ वर्षे, रा. संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) दत्तराज रमेश कांबळे, २) शेषराज कांबळे, दोघे रा. संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे घरातुन व्यायाम करण्यासाठी जात असताना, वरील आरोपीत हे नमुद ठिकाणी आले व फिर्यादीने लावलेले सी सी टी व्ही कॅमेरे काढ म्हणून शिवीगाळ करुन जिव मारण्याची धमकी देवून, लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच रस्त्यावर पडलेला दगड डाव्या हाताचे बोटास मारुन जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४२१ इनामदार- ८६०५०१०१४१ |